# टयुनिशिया आणि लोकशाही

## पुरन्दरे चन्द्रशेखर

**पार्श्वभूमी**

टयुनिशिया हा देश आपल्याकडे फारसा परिचित नाही. पण त्याचा गेल्या १२ वर्षातील प्रवास पहाण्यासारखा आहे. तेथील काही संकेत बीजावस्थेत तरी आपल्याकडे प्रस्तुत दिसतात. काही असे – एक तर लोकशाही टिकवणे हा सततचा सतर्क प्रयत्न हवा कारण ती एक नाजूक व्यवस्था आहे. दुसरे म्हणजे बहुसंख्य त्याबाबत कितीही सावध असले तरी ती दुबळी करण्याचा विडाच जर बलिष्ठ सत्ताधीशांनी उचलला असला तर तो डाव यशस्वी होऊ शकतो. लोकमत कमकुवत ठरते. तिसरा मुद्दा म्हणजे, राष्ट्रीय संवादात, असुरक्षित सत्ताधीश देशाच्या गैरव्यवस्थेला अल्पसंख्यांकांना जबाबदार धरतात, मीडियावर आणि राजकीय विरोधकांवर निर्बंध घालतात. राष्ट्र शाबूत रहाण्यासाठी शासन, न्याय इ. संस्था कायम बळकट लागतात, हा आणखी एक मुद्दा.

टयुनिशिया हा अरब देश आफ्रिका खंडाच्या उत्तर टोकाला आहे. लोकसंख्या सुमारे एक कोटी वीस लाख. १९५६ पर्यन्त तो देश फ्रेंच वसाहत होता. नंतर दोन अध्यक्ष झाले. '८७ पर्यन्त बूर्गिबा, नंतर २०११ पर्यन्त बेन अली. अलीच्या कारकीर्दीत देशाचा खजिना त्याच्या कुटुंबाने लुटला. विरोध, स्वतंत्र मीडिया मंजूर नव्हते, मानवी हक्कांची पायमल्ली झाली.

या पार्श्वभूमीवर २०११ चा 'अरब वसंत' तेथे सुरू झाला, १७ डिसेंबर २०१०ला टयुनिशियाच्या एका शहरातील एक दुर्घटना हे तात्कालिक निमित्त. मोहम्मद बौझाजी हा २६ वर्षांचा हातगाडीवर किरकोळ माल विकणारा तरुण. त्याने पोलिसी दडपशाहीचा निषेध म्हणून नगरपालिकेच्या ऑफिससमोर भर दिवसा साडेअकरा वाजता स्वत:ला जाळून घेतले. या प्रसंगाचे तीव्र पडसाद टयुनिशियात सर्वत्र उमटले. कारण शासकीय अवहेलना हा सगळ्यांचाच दैनंदिन अनुभव होता. 'ही हुकूमशाही राजवट उलथा' या मागणीसाठी लोक बहुसंख्येने रस्त्यावर आले.

अखेर बेन अलीला देश सोडायला लागला, त्याने सौदी अरेबियात आश्रय घेतला. हुकूमशाही जाऊन निर्वाचित लोकशाही आली. त्यामुळे असा निषेध केला तर सत्ताबदल होऊ शकतो हे मध्य–पूर्वेत लोकांना जाणवले. मग अशा निषेधांची लाटच अनेक अरब देशांत उसळली. हा 'अरब वसंत'. या असंतोषाला अनेक कारणे होती. हुकूमशहा व देशाची लूट हे एक पण खालावत जाणारी अर्थव्यवस्था, राजरोस भ्रष्टाचार, अत्याचार ही इतर कारणे. पंधराहून अधिक देशांत सार्वजनिक निषेध मोठ्या प्रमाणावर झाले. मात्र, लिबिया आणि येमेन या दोनच देशांच्या सत्ताधीशांनी सत्ता सोडली. तेथे हिंसक अराजक आले.. इतरत्र हे निषेध त्या त्या राजवटीने हिंसेने दडपले. लोकांच्या मागण्या दूरच राहिल्या. टयुनिशिया हा अपवाद झाला.

**भ्रमनिरास**

पण लोकशाहीबाबतचा टयुनिशियातील लोकांचा भ्रमनिरास उठावानंतरच्या दशकातच सुरू झाला. लोकमत चंचल असते हे मान्य करूनही, २०२० पर्यन्त लोकांना बेन अलीची हुकूमशाही बरी होती असे वाटू लागले हे लक्षणीय. वस्तुत: मध्य–पूर्वेतील इतर देशांपेक्षा टयुनिशियात सामाजिक व राजकीय परिस्थिती बरी होती. निवडणुका होत होत्या, स्त्रियांचा सार्वजनिक सहभाग होता, गुप्त पोलिसांचा राजकीय विरोधकांविरुद्धचा ससेमिरा कमी होता, इस्लामी पक्ष इतर काही देशांतील तशा पक्षांपेक्षा मवाळ व सहिष्णु होते. पण सामान्य माणसासाठी बेकारी, महागाई, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई वाढतच राहिल्या. निर्वाचित सरकारच्या अंतर्गत रस्सीखेचीत सत्ता मिळवणे महत्त्वाचे होते, देशहित नाही. टयुनिशिया हा जगातील थोड्या देशांपैकी एक देश आहे जेथे सुशिक्षितांना नोकरी मिळण्याची शक्यता अशिक्षितांना नोकरी मिळण्यापेक्षा कमी असते. भारत यावर उपाय म्हणून सरकारने एक कायदा केला. त्यानुसार दशकाहून अधिक काळ बेकार असणाऱ्या शिक्षितांना नोकरीची हमी दिली. पण पाठोपाठ कोविदमुळे पर्यटन व्यवसाय थंडावणे, परदेशी टयुनिशियन्सचे देशांत येणारे पैसे थांबणे इत्यादि कारणांनी हे धोरण अयशस्वी झाले.

**कैस सईद**

या परिस्थितीत जुलै २०२१ ला अध्यक्ष कैस सईद याने हस्तक्षेप केला.त्याने निर्वाचित संसद आणि सरकार बरखास्त केले, सगळी सत्ता आपल्या ताब्यात घेतली. हा महत्त्वाचा मुद्दा आहे – सरकार, संसद जर जनहितकारक नसतील, तर अगदी संवैधानिक मार्गानेही सर्वंकष सत्ता एका व्यक्तीने आपल्या हातात घेणे कितपत उचित आहे? या मार्गाची संस्थात्मक परिणती पाकिस्तानात दिसली आहे. अतोनात भ्रष्टाचारी निर्वाचित राजकारण्यांना रोखण्यासाठी लष्कराने तेथे सत्ता वारंवार ताब्यात घेतली आहे डआणि त्यादरम्यान भ्रष्टाचार लष्कराची मक्तेदारी केलेली आहे..

२०१९ ला सईद प्रचंड बहुमताने अध्यक्ष म्हणून निवडून आला होता तो 'मी भ्रष्टाचारी सरकार बदलेन' या जाहिरनाम्यावर. अशा आश्वासनांवर विश्वास ठेवणारे लोक हा लोकशाहीचा आणखी एक काळजीचा किंवा संशयास्पद गुणधर्म आहे. तो जगात सर्वत्र आढळतो. लोक आधीचे सरकार अक्षम म्हणून नवीन सरकार निवडतात, बऱ्याचदा आधीचे सरकार बरे अशी वेळ नवे सरकार आणते. हेच टयुनिशियात घडले आणि आर्थिक आणिबाणी चालूच राहिली. त्यात लष्कराच्या साक्षीने सईदने संसद बरखास्त केली. या कृत्याचा मोठा सार्वजनिक निषेध झाला. तो निष्फळ ठरला. तेव्हापासून आजवरची सईदची धोरणे व वक्तव्ये पहाता, त्याचे नेतृत्व देशाला आशादायक वाटत नाही. त्याचे अनिष्ट परिणाम शेजारच्या लिबिया, अल्जीरिया देशांवरही होणार. बृहत् प्रदेशच अस्थिर रहाणार.

सत्तेवर आल्यापासून सईदला संविधानाची अडचण वाटू लागली. डविशेष म्हणजे, राजकारणात येण्याआधी तो संवैधानिक कायद्याचा प्रोफेसर होता!.देशाच्या घटनेनुसार अध्यक्ष, लोकसभेचा सभापती आणि पंतप्रधान यांनी सत्ता एकत्रितपणे राबवायची असते. सईदने इतर दोघांना बाजूला सारून सगळी सत्ता स्वत:च्या हाती घेतली आहे. संसद बरखास्त केल्याच्या दोन महिन्यात सईदने आपण वटहुकूम काढून राज्य चालवणार हे स्पष्ट केले. म्हणजे संसदेच्या मान्यतेची औपचारिक गरजही संपली. मग मागच्या जुलैमध्ये नवीन घटनेसाठी सार्वमत घेण्यात आले. त्यात फक्त एक–तृतीयांश लोकांनी मतदान केले. त्यातील ९० टक्केहून जास्त लोक नवीन घटना आणावी या मताचे होते! असा आभासी पाठिंबा जुन्या कम्युनिस्ट राजवटींमध्ये असे..

तरीही देखाव्यासाठी डिसेंबर २०२२ ला संसदीय निवडणुका घेण्यात आल्या. त्यात तर फक्त ९ टक्के लोकांनी मतदान केले. निर्वाचनाने आपली परिस्थिती सुधारेल हा विश्वासच लोकांना राहिलेला नाही. शिक्कामोर्तब करणाऱ्या नवीन संसदेच्या उद्घाटनाची बातमी देण्यास /चित्रीकरणास मीडियावर बंदी घालण्यात आली. सईदवर टीका करणाऱ्या प्रमुख पत्रकारांना, उद्योगपतींना, राजकारण्यांना राजद्रोहाच्या आरोपांखाली अटक करण्यात आली आहे.

आता तर स्थानिक स्वराज्य संस्थाही बरखास्त करण्याचा प्रस्ताव आहे. म्हणजे, तळागाळापर्यंत पोचणारी राजकीय संरचना मोडकळीत काढण्यात येत आहे.

**स्थलांतरित**

टयुनिशिया इतर आफ्रिकेतील देशांपेक्षा आर्थिक दृष्ट्या जरा वर आहे. त्यामुळे त्या देशांतून बरेच आफ्रिकन मोलमजुरीसाठी किंवा पुढे युरोपला जाण्यासाठी टयुनिशियाला अल्पकाळासाठी येतात, ते अरब नाहीत, कृष्णवर्णीय आहेत. अरब जी कामे करत नाहीत ती शेतमजुरी, बांधकाम अशी काबाडकष्टाची कामे हे लोक करतात. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ते एक टक्कादेखील नाहीत. पण सईदच्या मते या स्थलांतरितांमुळे देशाची मुस्लिम व अरब ही ओळख अल्पावधीत धोक्यात येईल. अरब अल्पसंख्यांक होतील. हा 'आपल्याविरुद्ध कट आहे.' हे विधान त्याने २१ फेब्रुवारीला केले. त्याचा टयुनिशियाच्या कामगार संघटनेने लगेच निषेध केला, लोकांनी 'आम्ही सगळेच आफ्रिकन' अशा घोषणा देत मोर्चेही काढले पण त्याचबरोबर या स्थलांतरितांवर हिंसक हल्लेही सुरू झाले आहेत. मुळात अर्थव्यवस्था उताराला लागली आहे. त्यावरून लोकांचे लक्ष वळवण्यासाठी दुर्बल घटकांविरुद्ध असे गैर मुद्दे उभे केले जातात.

**सईदनंतर काय?**

आज सईद एकमेव सत्ताधीश आहे. पण कोणतेही राष्ट्र ही संस्था असते. परंपरेने आनुवंशिक व्यवस्था नसल्यास अशा माणसानंतर सत्तान्तर सुलभ होईल यासाठी व्यवस्था सक्षम लागते. म्हणजे निर्वाचित लोकप्रतिनिधी, नोकरशाही, न्यायसंस्था या तर स्वतंत्र लागतातच पण मीडियाही स्वतंत्र असावा लागतो. या संस्था जर वर्तमान सत्ताधीशाची री ओढणाऱ्या असतील तर देश अस्थिर होतो. अशी तकलादू 'व्यवस्था' मध्य–पूर्वेतील

अनेक अरब देशांत आहे. तेथे वारसाहक्काने राजा असतो सौदी अरेबिया, जॉर्डन किंवा लष्करशहाने सत्ता काबीज केलेली असते. इजिप्त, सुदान अशी राजवट जाऊन लोकशाही यावी यासाठी तर अरब वसंत सुरू झाला.

टयुनिशियाचे अपयश त्यामुळे अधिक चिंताजनक ठरते. तो एकमेव देश लोकशाही मार्गाने जात होता. नजीकच्या भविष्यात सईदनंतर बहुधा एकतंत्रीय राजवट येण्याची शक्यता आहे. आताच अबीर मुसा या आघाडीच्या महिला नेत्यासारखे काही राजकारणी २०११ च्या उठावाबद्दल असंतोष व्यक्त करतात. ते बेन अलीचा पुरस्कार करतात. आजवर मवाळ असणारा एन्हादा हा इस्लामी पक्ष अधिक जहाल होऊ शकतो. आणि या दोन्हींना विरोध म्हणून लष्कर पुढे येऊ शकते. म्हणजे, मध्य–पूर्वेच्या इतर देशांच्या दिशेनेच टयुनिशिया जाणे संभाव्य आहे.

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk